दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
Scan QR code to visit... Epaper Portal
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक २३२ • Title - Code :- MAHMAR49513 • रविवार दि.२ जून २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

## पालकमंत्री म्हणून आयुक्तांना फोन करणे माझे काम

# पण सर्वजण माझ्यावरच घसरले

## दमानियांच्या आरोपांवर दादांची स्पष्टोक्ती



**पुणे (वृत्तसंस्था)–पुणे हिट अँड रन प्रकरणी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सरकारवर कोणाचाही दबाव नसल्याचे स्पष्ट केले आहे. पोलिसांनी या प्रकरणी मुलाला, त्याच्या बापाला व त्याच्या बापाच्या बापाला अटक केली आहे. सरकार या प्रकरणी कोणतीही लपवाछपवी करत नाही, असे त्यांनी ठणकावून सांगितले आहे. दरम्यान, या प्रकरणी शनिवारी सकाळी अल्पवयीन आरोपीची आई शिवानी अग्रवालला अटक कार्यात आली आहे.याबाबत प्रसार माध्यमांशी बोलतांना अजित पवार म्हणाले, ''पुणे पोर्श कार अपघात प्रकरणात राज्य सरकार आणि पोलिस योग्यप्रकारे कारवाई करत आहेत. आम्ही सारखेसारखे कॅमेऱ्यासमोर येत नाही म्हणजे याप्रकरणात कोणतीही लपवाछपवी किंवा कोणालाही पाठीशी घालण्याचा प्रकार होतोय, असे अजिबात नाही. विरोधक याप्रकरणात काय आरोप करतात, हा त्यांचा अधिकार आहे. पण ही घटना घडल्यापासून आजपर्यंत चौकशीत जे जे दोषी आहेत, त्यांच्यावर कारवाई होताना दिसत आहे'', असे अजित पवार म्हणाले.**

शिवाय याप्रकरणी अजित पवार गटाचे आमदार टिंगरे यांच्यावर आरोप केले जात आहेत. यावर देखील अजित पवारांनी प्रतिक्रिया दिली आहे. तेव्हा अजित पवार म्हणाले, ''राज्यात एखाद्या भागात काही घटना घडली तर त्या भागातील आमदार पोलिस ठाण्यात जात असतात. आमदाराकडून पोलिसांना योग्य चौकशी करण्याचा सूचना दिली जाते. त्यानुसार आमदार सुनील टिंगरे गेले होते. त्यांनी कोणताही दबाव आणला नाही. हे प्रकरण आता जनतेचे प्रकरण झाले आहे. या प्रकरणात चौकशी पारदर्शकपणे सुरू आहे'', असे म्हणत अजित पवारांनी सुनील टिंगरे यांची पाठराखण केली आहे.अजित पवारांवर पोलिस आयुक्तांना फोन करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी तो आरोप केला होता. याबाबत अजित पवार यांनी भाष्य केले आहे. ''मी पोलिस आयुक्तांना वर्षभर काही ना काही कारणासाठी फोन करत असतो. पुण्यातील अपघातानंतर मी त्यांना फोन करुन दोषींवर योग्य ती कारवाई करा, असे सांगितले. जिल्ह्याचा पालकमंत्री म्हणून हे सांगणं माझे काम आहे'', असे अजित पवार यांनी म्हटले. पण याप्रकरणात काहीजण माझ्यावरच घसरले, असा टोला अजितदादांनी अंजली दमानिया यांना लगावला.

## थोडक्यात

### दोन लाखांच्या फरकाने विजयी होणारच–नीलेश लंके यांचा दावा

**अहमदनगर**–निवडणुकीची रणधुमाळी सुरु झाली तेव्हाच मी दोन लाखांच्या फरकाने विजयी होणार हे जाहीर केले होते. मी आजही माझ्या वक्तव्यावर ठाम असल्याचा दावा अहमदनगर लोकसभा मतदार संघातील महाआघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांनी केला आहे. लोकसभा निवडणुकीचे एक्झिट पोल हे जाहीर होणार आहेत. त्या आधीच आपण विजयी होणार असल्याचा दावा लंके यांनी केला आहे.अहमदनगर लोकसभा मतदार संघात महायुतीचे उमेदवार सुजय विखे पाटील यांच्या विरोधात महाआघाडीचे उमेदवार नीलेश लंके मैदानात आहेत. नीलेश लंके यांनी या मतदारसंघातील विजयाबाबत मोठा दावा केला आहे. आपण दोन लाखांच्या फरकाने निवडून येणार असल्याचे लंके यांनी म्हटले आहे.सर्वसामान्य जनता आपल्यासोबत असल्याचा दावा देखील नीलेश लंके यांनी केला आहे. इतकेच नाही तर त्यांनी सुजय विखे पाटील यांना देखी टोला लगावला आहे. निवडणूक झाल्याबरोबर आपण इतरांप्रमाणे आराम करण्यासाठी कुठे गेलो नसल्याचे लंके यांनी म्हटले आहे. आपण अजूनही जनतेसोबत असल्याचे तसेच नियमित कामे करत असल्याचे देखील नीलेश लंके म्हणाले. या माध्यमातून त्यांनी सुजय विखे यांच्यावरही टीका केली. आमच्या विरोधी नेत्यांकडून सत्तेचा गैरवापर झाला असल्याचेही लंके यांनी म्हटले आहे.

### सात दिवसांत दुधाचे दर पुर्ववत करा नसता..

**मुंबई**–दुधाचे दर पुर्ववत करण्याच्या दृष्टीने सात दिवसांच्या आत शासनाने निर्णय घ्यावा, नसता रस्त्यावरुन उतरुन आंदोलन करण्याचा इशारा शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी दिला आहे. या संदर्भात सुप्रिया सुळे यांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. शेतकऱ्यांना दुधाला दर मिळत नसल्याचे शेतकरी चिंतेत असल्याचेही सुळे यांनी म्हटले आहे.देशात शेतमालाला दर नसल्यामुळे राज्यातील शेतकरी त्रस्त आहेत. त्यात त्यांना दूध उत्पादनातून थोडाफार आर्थिक फायदा होत होता. मात्र, आता दुधाचे दर देखील सातत्याने कमी होत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढत आहे.दूध उत्पादक शेतकरी चांगलाच अडचणीत सापडला आहे. या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी राज्य सरकारने सात दिवसात निर्णय घेण्याचे आवाहन देखील खासदार सुप्रिया सुळे यांनी केले आहे.

### यंत्रणा पॉवरफुल लोकांना पायघड्या घालून काम करतात

**मुंबई**–सामान्य लोकांनाच दबाव आणून या किडलेल्या व्यवस्थेवरच बायपास सर्जरी करावी लागणार आहे असे म्हणत राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी प्रशासनाला चांगलेच धारेवर धरले आहे. पुणे हिट अँड रनप्रकरणी त्यांनी एक ट्विट करत संतप्त प्रतिक्रीया दिली आहे. सामान्य लोकांसाठी काम करणं अपेक्षित असलेली ही व्यवस्था सरकार कुणाचंही असलं तरी केवळ पॉवरफुल लोकांना पायघड्या घालून त्यांच्यासाठीच काम करताना दिसते असे त्यांनी म्हंटले आहे.

### 'मद्यपाश एक जीव घेणारा आजार' यावर जन जागरण आयोजन

**वरोरा** –अल्कोहोलिक्स अनॉनिमस समर्पण समुह, वरोरा चा ६ वा वर्धापन दिनाचे निमित्ताने समूहाचे वतीने स्थानिक नेहरू उर्दू शाळा, वरोरा येथे 'मद्यपाश एक जीव घेणारा आजार' या विषयावर जन जागरण आयोजन रविवार दिनांक २ जून २०२४ ला करण्यात आलेले आहे.या सभेला पूर्वाश्रमीचे सुधारलेले बांधव व समाजातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत। तरी या कार्यक्रमाला नागरिकानी आवर्जून उपस्थित राहावे असे समूहाकडून विनंती करण्यात येत आहे.

## दारिद्र्य रेषेखालील असलेल्या कुटुंबीयांना घरकुल योजनेचा लाभ द्या–डॉ.अंकुश आगलावे

**वरोरा । प्रतिनिधी**



दारिद्र्य रेषेखालील असलेल्या कुटुंबीयांना घरकुल योजना लाभ मिळावा या संदर्भा केंद्रीय मानवाधिकार संगठनचे विदर्भ प्रदेश अध्यक्ष डॉ. अंकुश आगलावे मा. जिल्हाधिकारी चंद्रपूर यांना निवेदनातुन केली आहे.

चंद्रपूर जिल्हयातील आदर्श सांसद असलेले चंदनखेडा या गावात प्रधानमंत्री आवास योजनेचे लाभापासून काही ग्रामस्थ वंचित आहे. या गावात घरकुल योजनेचा लाभ काही ग्रामस्थांना मिळाला नसल्याचे ग्रामस्थांनी सांगितले आहे.

प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ सर्वसामान्यांना मिळण्यात यावा. सदरहू गावामध्ये अनेक लोकांनी घरकुल योजना मिळण्याकरीता फार्म भरले होते परंतु आजतागायात घरकुल योजनेचा लाभ मिळाला नाही .ग्रामीण भागातील दरिद्र्य रेषेखालील, बेघर व कच्चेघर असलेल्या कुटुंबीयांना घरकुल बांधकामासाठी अर्थसहाय्य देणे हा या योजनेचा उद्देश आहे. सदरील योजनेचे संपूर्ण निकस, अटी व शर्ती पुर्ण करणाऱ्यांना घरकुल योजनेचा लाभ मिळण्याची मागणी डॉ. आगलावे यांनी केली आहे.

## सावरगाव येथील लोक विद्यालय शाळेची उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम

### परिसरातील जनतेत विद्यार्थ्यांचे व शाळेचे सर्वत्र कौतुक

**तळोधी (बा.) । प्रतिनिधी**



नागभिड तालुक्यातील सावरगाव येथील लोक विद्यालयाची १० वी च्या उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम ठेवत शाळेचा एस एस सी परिक्षा मार्च चा निकाल ९०.९० टक्के लागला असून प्राविण्य प्राप्त श्रेणीमध्ये एकूण १५ विद्यार्थी आले. यांमध्ये प्रथम श्रेणीमध्ये २६, द्वितीय श्रेणीमध्ये ८,पास श्रेणीमध्ये १ असे एकूण ५० विद्यार्थी उतीर्ण झालेले आहेत. यात आदित्य दिवाकर आंबोरकर हा सावरगाव येथील विद्यार्थी प्रथम आलेला आहे त्याला ८४.२०टक्के एवढे गुण मिळाले.द्वितीय शुभम आनंदराव थेरकर ८२.४० गुण मिळाले. तर तृतीय कु.वैष्णवी अनिल बोरकर ८१.८० टक्के गुण प्राप्त झाले आहे. चौथा क्रमांक किर्ती भाष्कर उईके ८१.२० टक्के

आणि पाचवा अनिकेत भाष्कर डोंगरवार ८० टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झालेले आहेत.सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे दि रूरल एज्यूकेशन सोसायटी ब्रम्हपुरी चे अध्यक्ष व्ही.एस.तोंडरे,सचिव आर. एस.राऊत , मुख्याध्यापक पी. एम.कामडी आणि सर्व शिक्षकांनी कौतूक व अभिनंदन केले आहे.

## लोककलावंत छत्रपती महाकुलकर राष्ट्र संत विचार साहित्य परिषदेतर्फे सन्मानित

**वरोरा । प्रतिनिधी**



तालुक्यातील दहेगाव या छोट्याश्या गावातील सुप्रसिद्ध लोककलावंत छत्रपती महाकुलकर यांचा राष्ट्रसंत विचार साहित्य परिषदे च्या वतीने शाल व राष्ट्रसंत साहित्य देऊन ग्रामगिताचार्य बडोपंत बोढेकर यांनी सत्कार केला.

यावेळी वरोरा झाडीबोली साहित्य मंडळाचे अध्यक्ष कवी पंडित लोढे यांची उपस्थिती होती. वरोरा येथे छोटेखानी कार्यक्रमात सदर सन्मान करण्यात आला. छत्रपती महाकुलकर हे आज ७० वर्षाचे असून त्यांनी आपल्या तारुण्यात सुमारे ३५ वर्ष टेलरिंग चा व्यवसाय केला.त्यांच्यात बालपणापासून उपजत असलेले विनोदी वक्तृत्व पुढे बहरले आणी त्यांनी एकपात्री प्रयोगातून शेकडो गावात जिल्हा परिषदे च्या माध्यमातून जनजागृतीचे मोठे कार्य केले. दारूचे दुष्परिणाम , हुंडाबळी, अंधश्रद्धा निर्मूलन, राष्ट्रसंतांची ग्रामगिता आदी विषयावर त्यांनी त्या काळात सादर केलेले एकपात्री प्रयोग आजही अनेकाच्या स्मरणात आहे .श्री गुरुदेव सेवा मंडळ आणी राष्ट्रसंत विचार साहित्य परिषदेच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय राष्ट्रसंत साहित्य विचारकृती संमेलने त्यांनी गाजवली आहे. तेलंगणा राज्य सांगडी येथे संपन्न झालेल्या आंतरराज्य साहित्य संमेलनातील एकपात्री प्रयोग पाहून तेथील तेलगू दर्शक मंत्रमुग्ध झाले होते आता त्याचाच वारसा त्यांच्या च गावातील तरुण स्वप्नील कुथे यांनी हाती घेऊन तुकडोजी महाराज गाडगे महाराज याचे विचार घराघरापर्यंत पोहचविण्याचे काम करत आहे.

## किशोर लोखंडे यांचे निधन

**तळोधी (बा ) । प्रतिनिधी**



गिरगाव येथील श्री किशोर मुकुन्दा लोखंडे यांचे आज दिनांक ०१जुन २०२४ शनिवार ला पहाटे ५:३० वाजता वयाच्या ४२ व्या वर्षी दुःखद निधन झाले.त्यांच्यावर गिरगाव येथील स्मशानभूमीत दुपारी १२ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या मागे आई, पत्नी , दोन मुली असा आप्तपरिवार आहे .



**सध्या रखरखत्या उन्हातही सकाळ पासून दिवसभर प्रसिद्ध गायमुख देवस्थान इथे भाविकांची खुप गर्दी असते. आज शनिवारी दुपारी अनेक भाविक पहाडीवर मोठ्या आम्रराज वृक्षाच्या सावलीत गायमुख येथील नयनरम्य निसर्गाचा आस्वाद घेताना टिपलेले छायाचित्र. छाया :प्रणय बांगरे.**

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंती निमित्त निघालेल्या शोभायात्रेचे यंग चांदा ब्रिगेडच्या वतीने स्वागत

### शोभायात्रेत सहभागी समाज बांधवांसाठी शितपेयाची व्यवस्था

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंती निमित्त धनगर समाज बांधवांच्या वतीने शोभायात्रा काढण्यात आली होती. सदर शोभायात्रा जटपूरा गेट जवळ पोहचताच यंग चांदा ब्रिगेडच्या वतीने शोभायात्रेचे स्वागत करण्यात आले. यावेळी शोभायात्रेत सहभागी समाज बांधवांना शित पेयाचे वाटप करण्यात आले. यावेळी यंग चांदा ब्रिगेडचे युवा नेते अमोल शेंडे, महिला शहर अध्यक्षा वंदना हातगावकर, आदिवासी आघाडीचे जिल्हा अध्यक्ष जितेश कुळमेथे, अल्पसंख्याक आघाडीचे युवा शहर अध्यक्ष राशेद हुसेन, जय मिश्रा, सायली येरणे, राम जंगम, अस्मिता डोनाडकर, कविता निखारे, कैलास धायगुडे, विमल काटकर, अमोल नालमवार, रंजित मडावी यांच्यासह यंग चांदा ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.दरवर्षी प्रमाणे यंदाही धनगर समाज बांधवांच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्त समाज बांधवांच्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. तर संध्याकाळी शहरातून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. सदर शोभायात्रेचे स्वागत करण्यासाठी जटपूरा गेट येथे स्वागत मंच उभारण्यात आले होते. शोभायात्रा यंग चांदा ब्रिगेडच्या स्वागत मंचाजवळ पोहोताच यंग चांदा ब्रिगेडच्या पदाधिका–यांनी शोभायात्रेचे स्वागत केले. यावेळी यंग चांदा ब्रिगेडच्या पदाधिका–यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करुन अभिवादन केले. तर शोभायात्रेत सहभागी समाज बांधवांसाठी यंग चांदा ब्रिगेडच्या वतीने शितपेयाचे वाटप करण्यात आले. सदर शोभायात्रेत समाज बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# पाणी व चाराटंचाई निवारणार्थ तात्काळ कार्यवाही करावी - संजय बनसोडे

**परभणी । प्रतिनिधी**

जिल्ह्यात गतवर्षी झालेल्या अपुऱ्या पावसामुळे यंदा उन्हाळ्यात चारा व पाणीटंचाई निर्माण झाली आहे. या चारा व पाणीटंचाई निवारणार्थ जिल्हा प्रशासनाने तात्काळ उपाययोजना करण्याची कार्यवाही करण्याचे निर्देश राज्याचे क्रीडा, युवक कल्याण व बंदरे मंत्री तथा पालकमंत्री संजय बनसोडे यांनी आज जिल्हा प्रशासनाला दिले आहेत.

निम्न दुधना प्रकल्पाचे आरक्षित पाणी ९.०८ दलघमी पाणी नदीपात्राद्वारे सोडले आहे. त्यामुळे दुधना नदीकाठच्या ५६ गावांना सदर पाण्यापासून फायदा झाला आहे. तसेच जायकवाडी १.११३ दलघमी, येलदरी २७.६६४ दलघमी तर सिध्देश्वर धरणाचे १८.३१५ दलघमी आरक्षित पाणी पिण्यासाठी आरक्षित असल्याचे पालकमंत्री श्री. बनसोडे यांनी सांगितले.परभणी जिल्ह्यात ९ तालुक्यापैकी ८ तालुक्यांमध्ये पाणीटंचाई असून जिंतूर, गंगाखेड, सोनपेठ, परभणी या तालुक्यातील २० गावे, वाडी, तांडे यामध्ये २० खासगी टँकर्सद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. तसेच जिल्ह्यात १५२ गावे, वाडी, तांडे यामध्ये २०० विहीर, कुपनलिकांचे अधिग्रहण करुन पाणी पुरवठा केला जात आहे. प्रशासनाकडून टँकर, कुपनलिका व विहीर अधिग्रहणाचे अधिकार क्षेत्रीय स्तरावर देण्यात आले आहेत. त्यामुळे नागरिकांना पाणीटंचाई निर्माण झाल्यास लवकरात लवकर निवारणार्थबाबतच्या प्रस्तावांना मंजुरी प्रदान करण्यात येत असल्याचे पालकमंत्री श्री. बनसोडे यांनी सांगितले. ग्रामीण भागासाठी टंचाई निवारणार्थ १ हजार ७०३ योजना प्रस्तावित आहेत. त्यासाठी २३०७.७० लक्ष निधीची तरतूद आहे. तसेच नागरी भागासाठी टंचाई निवारणार्थ १४९ योजना प्रस्तावित आहेत. त्यासाठी ३६७ लक्ष निधीची तरतूद आहे. त्यानुसार प्रस्तावित कामांना मंजुरी देण्यात आली असल्याचेही त्यांनी सांगितले. तसेच जिल्ह्यातील गुरांसाठी पुरेसा चारा उपलब्ध असून ७५ व्यक्तींकडे चारा विक्रीसाठी उपलब्ध आहे. त्यांची यादी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर उपलब्ध आहेत. तसेच शासन स्तरावरुन व जिल्हा प्रशासनाच्या वतीने पिण्याचे पाणीटंचाई असल्यास १०७७ व जिल्हाधिकारी कार्यालयाच्या ०२४५२-२२३७०२, २२६४०० या दूरध्वनी क्रमांकावर पाण्याची मागणी नोंदविण्याचे आवाहन जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांनी केले आहे.जिल्ह्यात माहे जून ते सप्टेंबर सरासरी पर्जन्यमान ७६१.३ मि.मी. असून, गतवर्षी त्यापैकी ५२३ मि.मी. म्हणजेच ६८.६३ टक्के एवढेच पर्जन्यमान झाले. जिल्ह्यात मागील आठ वर्षात २०१८ वगळता सर्वात कमी पर्जन्यमान आहे. त्यामुळे जिल्ह्यातील २ मध्यम व २२ लघु प्रकल्पांपैकी २ लघु प्रकल्पामध्ये अत्यल्प पाणीसाठा आहे. इतर सिंचन प्रकल्प कोरडे पडले आहेत. येलदरी प्रकल्पामध्ये २७.०४ टक्के पाणीसाठा असून, सिध्देश्वर प्रकल्पामध्ये जिवंत पाणीसाठा नाही. तर जिल्ह्यातील सर्वच कोल्हापुरी बंधारेदेखील कोरडे आहेत.



# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा अवमान कोणीही सहन करणार नाही-राजेंद्र मस्के

## भाजपातर्फे पुतळा दहन करून जितेंद्र आव्हाडांचा जाहीर निषेध



**बीड । प्रतिनिधी**

भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो फाडून आमदार जितेंद्र आव्हाडांनी केलेली चूक अक्षम्य आहे. पोटात एक आणि ओठात एक ठेऊन महामानवाचा अपमान करण्याचे धाडस निषेधार्थ आहे. भारतीय इतिहासात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आंदोलनामुळे महाड येथील चवदार तळ्याला अनन्य साधारण महत्व आहे. अशा क्रांतिकारी स्थळावर जाऊन जितेंद्र आव्हाडांनी प्रसिद्धीच्या झोतामध्ये येण्यासाठी हि स्टंटबाजी केली. प्रसिद्धीच्या हव्यासापोटी डॉ. बाबासाहेबांचा फोटोही त्यांनी फाडला. यापूर्वी अनेक थोर पुरुषांचा अपमान आव्हाडांनी केलेला आहे. देशातील कोणताही नागरिक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अवमान कदापीही सहन करणार नाही. घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अपमान करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला घटनेच्या कोणत्याही पदावर राहण्याचा अधिकारी नाही. जितेंद्र आव्हाड यांनी केलेली अक्षम्य चूक लक्षात घेता त्याचां तातडीने राजीनामा घेतला पाहिजे. अशी प्रतिक्रिया भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी व्यक्त केली. आज संघर्ष योद्धा भाजपा जनसंपर्क कार्यलय समोर बीड जिल्हा भारतीय जनता पार्टीच्या वतीने आमदार जितेंद्र आव्हाडांच्या पुतळ्याचे दहन करत निषेध व्यक्त केला.यावेळी नवनाथ शिराळे, बालाजी पवार, प्रमोद रामदासी, केशव बडे, अमोल वडतिले, बद्रीनाथ जटाळ, लालासाहेब पन्हाळे, राजू शहाणे, अनिल शेळके, बंटी भिसे, महेश सावंत, विलास काकडे, अश्विन शेळके, महादेव नैराळे, विशाल पाखरे, मनोज आगे, शफिक भाई काजी, राम चव्हाण, गणेश शेंडगे, सचिन जाधव, सचिन मस्के, स्वप्नील मस्के, रवींद्र कळसाने, राम बहिरवाळ, प्रल्हाद चित्रे, दिलीप डोंगर आदि उपस्थित होते.

# कोथळा येथील सरस्वती माध्यमिक विद्यालयाचा ९३.८७ % निकाल

**मानवत । प्रतिनिधी**

सरस्वती माध्यमिक विद्यालय कोथळा तालुका मानवत शाळेचा मार्च २०२४ मध्ये झालेल्या महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा मध्ये निकालाची परंपरा कायम राखत विद्यालयाचा निकाल ९३:८७% लागला असून परीक्षेसाठी प्रविष्ट विद्यार्थी संख्या एकोणपन्नास बसले होते. तर विशेष प्राविण्यासह अकरा विद्यार्थी उत्तीर्ण झाले. विद्यालयात प्रथम श्रेणीत विस विद्यार्थ्यांनी बाजी मारली. तर द्वितीय श्रेणीत दहा विद्यार्थी आले. आणी पाच विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून विद्यालयातून प्रथम पाते आराधना आत्माराम ९४.४०% , द्वितीय सम्रतकर भरत दत्ता ९४.२०% , तृतीय निर्वळ गोविंद ज्ञानेश्वर ९२.२०% मार्क्स घेऊन उत्तीर्ण झाले. आहेत सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या या




दैदिप्यमान यशाबद्दल सामाजिक सलोखा सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष श्री एस.एन. कांबळे, सचिव श्री आर. व्ही. कवडे आर व्ही (कवडे मामा) यावेळी सर्व सन्माननिय संचालक, व कोथळा ग्रामस्थ विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री एच.जी.पाटील, शिक्षक श्री. नरवाडे सर श्री, बिरादार सर श्री. होनाळे सर श्री,घूगे सर शिक्षकेतर श्री, आय.व्ही. मोरतळ , एम.डी. मोरतळे, डी.आर. सोनकांबळे, एन.एस. शिंदे, पी.पी.मोगरे आदी कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक प्रगतीसाठी यावेळी गूणवंत विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

# आता सातबारावर दिसणार आईचे नाव

**पुणे । प्रतिनिधी**

शाळेच्या दाखल्यासह विविध सरकारी कागदपत्रांमध्ये आईच्या नावाचा समावेश करण्याचा निर्णय राज्य सरकारने याआधीच घेतला आहे. आता आणखी एका महत्त्वाच्या कागदपत्रांमध्ये आईच्या नावाचा समावेश करण्यात येणार आहे. सातबारा उताऱ्यावर अर्जदाराच्या नावानंतर आता त्याच्या आईच्या नावाचा समावेश करण्याचा निर्णय भूमी अभिलेख विभागाकडून घेण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, राज्य सरकारच्या महिला व बालकल्याण विभागाने काही महिन्यांपूर्वी महिलांच्या नावाचा अर्थात आईच्या नावाचा समावेश करण्याचा निर्णय घेतला होता. त्याच अनुषंगाने १ मे २०२४ नंतर जन्माला आलेल्या व्यक्तीच्या नावे जमीन, सदनिका खरेदी केल्यास त्याच्या नावासह आईच्या नावाचा उल्लेख करण्यात येणार आहे. त्या संदर्भात भूमी अभिलेख विभागामार्फत संगणकप्रणाली राबविण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. सहा महिन्यांत होणार अंमलबजावणी दरम्यान, सातबारा उताऱ्यात आईच्या नावासाठी नवा कॉलम तयार केला जात आहे. त्यामुळे पुढील सहा महिन्यांत याची अंमलबजावणी होईल अशी माहिती मिळाली आहे. त्यासोबत आईचे नाव लावण्यासाठी काही कागदपत्रे गरजेची आहेत. आई असल्याचा पुरावा दिल्यानंतरच आईचे नाव लावता येणार आहे. तसेच तलाठी कार्यालयात शहानिशा केल्यानंतर ही नोंदणी होईल असे सांगण्यात आले आहे. विवाह आधीच्या नावानेही होईल नोंदणीसध्या महिलांची नावे लावताना महिलेचे स्वतःचे नाव, पतीचे नाव आणि आडनाव असा क्रम आहे. मात्र सातबारा उताऱ्यावर आईचे नाव लावताना त्यांचे आधीचे म्हणजे लग्नापूर्वीचे नाव देखील लावण्याची मुभा असणार आहे.

# परभणीत चैतन्य महाराज देगलूरकर यांची प्रवचन माला

**परभणी । प्रतिनिधी**

संत वांङ्मयाचा प्रचंड अभ्यास आणि अतिशय ओघवती वाणी असणार्या हभप चैतन्य महाराज देगलूरकर यांचे १ ते ३ जून या दरम्यान परभणीत ‘श्रीमद्भगवतगीता भावदर्शन अध्याय -६’ या विषयावर प्रवचन होणार आहे.परभणीतील चैतन्य प्रतिष्ठानच्या वतीने मागील सहा वर्षांपासून या तीन दिवशीय ज्ञानयज्ञाचे आयोजित केले आहे. संत वांङ्मयाचा प्रचंड अभ्यास आणि अतिशय ओघवती वाणी असणार्या हभप चैतन्य महाराज देगलूरकर यांच्याकडून मानवी जीवनाचे समग्र तत्वज्ञान विषद असणार्या भगवतगीतेतील अध्याय समजून घेता यावेत आणि त्यातील



विचार अंशतः का होईना जीवनात अंगीकारता यावेत या हेतूने सात वर्षांपूर्वी परभणीतील साहित्य व अध्यात्मप्रेमी नागरीकांनी एकत्रित येवून चैतन्य प्रतिष्ठानची स्थापना केली. या प्रतिष्ठानच्या वतीने मागील सहा वर्षांपासून तीन दिवशीय ज्ञानयज्ञाचा हा उपक्रम अखंडपणे सुरु ठेवला आहे. देगलूरकर महाराजांच्या अमृतवाणीतून दरवर्षी या प्रमाणे श्रीमद्भगवतगीतेतील अध्यायांवर साध्या व सोप्या भाषेत अनुरुप, प्रभावी दाखल्यांसह विश्लेषण होत आहे. यावर्षी गीतेतील सहाव्या अध्यायावर प्रवचन होणार आहे.नांदखेडा रस्त्यावरील वैष्णवी मंगल कार्यालयात १ ते ३ जून दरम्यान सायंकाळी ६ ते ८ या वेळेत हे प्रवचन होणार असून त्यास जास्तीत जास्त संख्येने परभणीकरांनी उपस्थित रहावे, असे आवाहन चैतन्य प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.

# बीड शहरातील सामान्यांना आपलसं वाटणारा नगरसेवक शेख आमेर अण्णा

बीड शहरातील प्रत्येकांच्या सुख दुखात आपल्या प्रभागातील जनतेसाठी नव्हे तर बीड शहरातील तमाम सर्वसामान्यांच्या अडीअडचणीसाठी अहोरात्र झटणारा नगरसेवक म्हणजे शेख आमेर अण्णा मनात इच्छाशक्ती असली तर काही पण होतं याचा उत्तम उदाहरण शेख आमेर अण्णा सर्व सामान्य कुटुंबातून येऊन आपल्या कर्तुत्वाच्या जीवावर सामान्यांच्या जनतेवर अधिराज्य गाजवणारा राजा माणूस म्हणून बीड शहरात नगरसेवक आमेर अण्णा यांची ओळख समाजसेवा करणयाची इच्छा असेल तर अनेक अडचणीवर मात करुन गोरगरीब जनतेची सेवा करणारे अनेक समाजसेक आहेत कसलाही राजकीय वारसा



नसताना गोरगरिबांच्या हाकेला धावून जाणारे नगरसेवक शेख आमेर अण्णा हे आहेत बीड शहरातील वार्ड क्रमांक ८ मधुन नगरसेवक म्हणून निवडून आलेले शेख आमेर अण्णा यांनी गोर गरीब जनतेला रेशन कार्ड उपलब्ध करून दिले आहेत वार्डात लाईट पाणी इत्यादी सुविधा जिल्हा रुग्णालयात गोरगरिबांना मदत करतात कोरोना काळात त्यांनी अनेक कुटुंबांना धान्य वाटप किराणा वाटप करुन गोरगरीब जनतेची सेवा केली करोना काळात रुग्णांना शासकीय हॉस्पिटल मध्ये ऍडमिट करून रुग्णसेवा ही त्यांनी दिली लोकांच्या सुख दुखात सदैव सहभागी असतात आपले कार्य पूर्ण तत्वावर नेण्याचा प्रयत्न करतात बीड शहरात त्यांचा मोठा मित्र परिवार आहे व त्यांच्या सामाजिक सेवेतून ते जनतेच्या सेवेसाठी कधीही तत्पर आहेत राजकीय मतभेद बाजूला ठेवून जनतेची सेवा करणे ही काळाची गरज आहे आणि या कसोटीत शेख आमेर अण्णा हे खरे ठरतात त्यामुळे अशा समाजसेवकाची समाजात वेगळी ओळख नगरसेवक शेख आमेर अण्णा यांना वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा त्यांना उदंड आयुष्य लाभो हीच सदिच्छा.

# सामाजिक परिवर्तनासाठी महिलांनी समाजकार्यात पुढे यावे-अनिता काळे





**पुणे । प्रतिनिधी**

सामाजिक परिवर्तनासाठी महिलांनी समाजकार्यात पुढे आले पाहिजे. महिला एकजूट झाल्यास सक्षमीकरणाची नांदी ठरणार आहे. सध्या सर्वच क्षेत्रात महिला आघाडीवर असून, महिलांनी राजकारण व समाजकारणात येऊन बदल घडविण्याची गरज असल्याचे प्रतिपादन मराठा समन्वय परिषदेच्या राज्य कार्याध्यक्ष अनिता काळे यांनी केले. सृष्टी सेवाभावी संस्थेच्या वतीने पुणे येथील बालगंधर्व रंगमंदिर येथे आयोजित राजमाता जिजाऊ, सावित्रीबाई फुले, अहिल्यादेवी होळकर, माता रमाबाई आंबेडकर, माई सिंधुताई सपकाळ राज्यस्तरीय पुरस्काराने विविध क्षेत्रातील कर्तुत्ववान महिलांचा गौरव करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात काळे बोलत होत्या. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रीय फिल्म सल्लागार समितीच्या सदस्या डॉ. स्मिता बारवकर, डॉ. भावना शेवनकर, संगीता गुरव, सामाजिक कार्यकर्त्या विद्याताई गडाख, रेश्मा जगताप, अनुराधा सरवदे आदी मान्यवर महिला उपस्थित होत्या.पुढे काळे म्हणाल्या की, महिलांनी स्वतःमधील क्षमता ओळखून, स्वयंपूर्ण व्हायला हवे. महिला मुळातच सक्षम असतात. कोणतेही आव्हानात्मक काम तिने मनावर घेतल्यास ते सहजपणे करू शकतात. महिलांच्या यशस्वी होण्याच्या वाटचालीत पुरुषांचाही हातभार आहे. महिलांनी आवडीच्या क्षेत्रात कार्य करुन आर्थिक सक्षम होण्याचे त्यांनी आवाहन केले. प्रारंभी निष्ठा सुपेकर व आभास सुपेकर या विद्यार्थ्यांनी स्वागत गीत सादर केले. या कार्यक्रमात काळे यांच्या हस्ते विविध क्षेत्रातील महिलांना पुरस्कार वितरण करण्यात आले. प्रास्ताविकात त्रिवेणी मोघे यांनी महिला सक्षमीकरणासाठी सृष्टी सेवाभावी संस्थेच्या वतीने सुरु असलेल्या कार्याची माहिती दिली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सृष्टी सेवाभावी संस्था आंबेजोगाई (जि. बीड) अध्यक्षा मीनाक्षी डोंगरे, उपाध्यक्ष माधुरी साळवे, सचिव भारती एकलारे, विकास डोंगरे, वर्षा जाधव, त्रिवेणी मोघे, संजय पवार आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अलका जोशी यांनी केले. आभार अविनाश कदम यांनी मानले.

# श्रीरामपूर नगर पालिकेत प्रशासकीय राज याठिकाणी कोणाचा कोणाशीच मेळ नाही

## त्यावर नुतन मुख्याधिकारी जाधव साहेबांना सैनिक समस्या जाणून घेण्यास वेळ नाही

**श्रीरामपूर । प्रतिनिधी**

अनेक दिवसांपासून माजी सैनिकांची घरपट्टी माफीची मागणी असल्याने घरपट्टीचा विषय शासनाच्या विचाराधीन होता त्या अनुषंगाने सन २०२२ रोजी महाराष्ट्र राज्य शासनाने शासन निर्णय काढून त्यामध्ये सरसकट घरपट्टी माफ न करता केवळ संकलित कर हा माफ करण्यात आला इतर कर लावले आहेत तरीही या निर्णयामध्ये सर्व माजी सैनिक समाधानी आहेत या सर्व गोष्टींसाठी संबंधित शासनाने ठरवून दिलेले कागदपत्र जे माजी सैनिक शहरी विभागात नगरपरिषद अंतर्गत राहतात त्यांनी नगर परिषदेकडे अगोदरच सुपूर्द केले आहेत आणि त्यामुळे सण २०२२ /२३ या वर्षाचा संकलित कर माफ करण्यात आला परंतु आत्ता सन २०२३ /२४ या वर्षाची जी पट्टी आली आहे तिच्यासाठी नगरपरिषद पुन्हा कागदपत्रांची मागणी माजी सैनिकांकडे करत आहे ज्यामध्ये जुन्या यादीत सैनिकांचे कागदपत्र व नाव नमूद केले आहे त्या सैनिकांकडे पुन्हा पुन्हा कागदपत्रांची मागणी केली जात आहे शहरी विभागात राहणारे सर्व माजी सैनिक पट्टी आल्यापासून म्हणजे गेल्या सहा महिन्यापासून पट्टी भरण्यासाठी स्वतः नगर परिषदेमध्ये जात आहे परंतु नगरपरिषद पट्टी भरून घ्यायला तयार नाही आणि शहरातील इतर रहिवासी पट्टी भरत नाहीत म्हणून त्यांच्या पाठीमागे पट्टी भरण्यासाठी घंटागाडी व इतर गाड्यांमध्ये अलाउंस करून तगादा लावला जात आहे, त्रिदल सैनिक संघटनेच्या माध्यमातून अनेक वेळा वसूली अधिकारी व उपमुख्याधिकारी यांची वारंवार भेट घेतली सॉफ्टवेअर सिस्टीम चा प्रॉब्लेम आहे पट्टी भरता येणार नाही, अशा प्रकारचे उत्तर देण्यात आले शेवटी विनंती करण्यात आली की कमीत कमी पाणीपट्टी आणि संकलित कर वगळून बाकी तरी पट्टी आमची भरून घ्या जेणे करून शास्ती तरी लागणार नाही आणि त्या अनुषंगाने नगरपरिषदेने संकलित कर व पाणी पट्टी भरून घेतली परंतु उशीर झाल्याने घरपट्टी आणि




पाणीपट्टीला असणारी शास्ती सर्व माजी सैनिक पट्टी धारकांना पालिकेची चूक असूनही नाहक भुर्दंड दिला आहे. त्या अनुषंगाने मा. सोमनाथ जाधव मुख्याधिकारी नगरपरिषद श्रीरामपूर यांना शहरात रहिवाशी असलेले माजी सैनिक, त्रिदल सैनिक सेवा संघाचे नगर उत्तर विभागाचे उपाध्यक्ष मेजर कृष्णा सरदार, तालुका अध्यक्ष संग्रामजीत यादव, पट्टी धारक मेजर संपत लगड हे कार्यालयात भेटून आपल्या या पट्टी संदर्भात व्यथा मांडत असताना लवकर बोला माझ्याकडे वेळ नाही आणि एकदा सांगितले आहे तुम्हाला सॉफ्टवेअर सिस्टीमचा प्रॉब्लेम आहे माझा नाही, मला एवढा वेळ नाही असे म्हणत कुठल्याही परिस्थितीत माजी सैनिकांची मुख्याधिकाऱ्यांनी तक्रार ऐकून घेतली नाही. भारत मातेची सेवा केलेल्या सैनिकांसाठी वेळ नाही परंतु ठेकेदार व टेंडर धारक यांच्या साठी मात्र नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांकडे भरपूर वेळ आहे, कारण त्यामधून ठरल्याप्रमाणे मोठ्या प्रमाणात मिठाई बॉक्स मिळणार असते,आता या मिठाई बॉक्स मध्ये मिठाईच असते की अन्य काही हे सर्वश्रुत आहे,तशी सांगायाची आवश्यकता नाही ? मात्र मग त्या ठेकेदारांप्रमाणे या सैनिकांकडून तरी काय मिळणार ? या हेतूने त्यांच्याकडे वेळ नसणे हे स्वाभाविकच.अशा प्रकारची खंत माजी सैनिकांकडून व्यक्त केली जात असल्याचे त्रिदल सैनिक सेवा संघाचे नगर उत्तर विभागाचे उपाध्यक्ष मेजर कृष्णा सरदार व तालुकाध्यक्ष संग्रामजीत यादव यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

# जलवाहिणीचे कामात अडथडा टाकणारे अतिक्रमण जमीनदोस्त

## अतिक्रमण काढण्यासाठी प्रशासक स्वत: रस्त्यावर



**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

पाणीपुरवठा लाईन टाकण्याचा कामात अडथळा ठरणारे अतिक्रमण तवरीत काढण्याचे आदेश छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांनी दिले होते. यानिमित्त त्यांनी आज जळगाव रोड, आंबेडकर नगर, देवळाई येथे खडी रस्ता या भागांची पाहणी केली आणि पाईपलाईन टाकण्याचा कामात अडथळा ठरणारे अतिक्रमण काढण्याची कारवाई आजपासूनच सुरू करावी असे देखील आदेश दिले होते.

या आदेशानुसार आज अतिरिक्त आयुक्त संतोष वाहूळे आणि सहाय्यक आयुक्त अशोक गिरी यांनी कारवाईची सुरुवात केली आणि जळगाव रस्त्यावरील अतिक्रमणे काढण्याची सुरुवात केली. अतिक्रमण काढल्याबरोबर एमजेपी मार्फत जलवाहिनी टाकण्यासाठी खड्डे करण्याचे काम देखील याच वेळी सुरू करण्यात आले. संध्याकाळपर्यंत जळगाव टी पॉईंट ते सिडको बस स्टॅन्ड कडे जाणाऱ्या रस्त्यावर दोन मटन दुकान, दोन गॅरेज, टपऱ्या इत्यादी सह एकूण वीस अतिक्रमण काढण्यात आले.


सदर कारवाईत अतिक्रमण निरीक्षक सय्यद जमशेद, सागर श्रेष्ठ, यशोदा पवार, प्रसाद रोडे यांचे पथक सहभागी झाले होते. पाहणी करताना दोन रसवंती चालकांनी रस्त्यावर रसवंतीचा पूर्ण कचरा टाकल्याने आयुक्त यांनी थांबून त्यांच्याशी चर्चा केली व त्यांना लगेच दहा हजार रुपये दंड लावला. शहरात विविध ठिकाणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मार्फत पाण्याची पाईपलाईन टाकण्याचे काम सुरू आहे. काही अतिक्रमण धारक हे पाईप लाईन टाकण्याचा कामात अडथळा निर्माण करत होते, याबाबत एमजेपी आणि ठेकेदाराने आयुक्त कडे तक्रार केली होती.

# जलजन्य, कीटकजन्य आजारांच्या रुग्णांचा शोध पावसाळ्यासाठी राज्य आरोग्य विभाग अलर्ट'वर

## जोखीमग्रस्त गावांची लिस्ट तयार करा; साथरोग निदानासाठी प्रत्येक जिल्ह्यात लॅब;या सूचनांचे पालन करा !

**मुंबई । प्रतिनिधी**

पावसाळ्यात उद्भवणाऱ्या साथीच्या आजारांना रोखण्यासाठी जलजन्य, कीटकजन्य आजारांच्या रुग्णांचा शोध घ्या. जोखीमग्रस्त गावांची लिस्ट तयार करा. मलेरिया, डेंग्यू, लेप्टो आदी साथीच्या आजारांचे वेळीच निदान करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात एक प्रयोगशाळा कार्यान्वित करणे, जिल्हा, तालुका स्तरावर शीघ्र प्रतिसाद पथक कार्यान्वित करा, अशा सूचना राज्य सार्वजनिक आरोग्य विभागाकडून जिल्हा, तालुका स्तरावर देण्यात आल्या आहेत. राज्यातील विविध विभागात तसेच जिल्ह्यांमध्ये पावसाचे प्रमाण कमी अधिक असते. त्यामुळे काही भागात पाणीटंचाई तर काही भागात पूरस्थितीला तोंड देण्याची वेळ येऊ शकते. गडचिरोली, चंद्रपूर, गोंदिया या जिल्ह्यांमध्ये हिवताप तर विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये जपानी मेंदूज्वर, चंडीपुरा मेंदूज्वर तर कोकणपट्टीतील जिल्ह्यांमध्ये लेप्टोस्पायरोसीस, शहरी भागात डेंग्यू अशा विविध साथीच्या आजारांचा पावसाळ्यात फैलाव होण्याची शक्यता अधिक असते.




त्यामुळे जलजन्य तसेच कीटकजन्य आजाराच्या प्रभावी नियंत्रणासाठी विविध उपाययोजना करण्याच्या सूचना सार्वजनिक आरोग्य विभागाने दिल्या शीघ्र प्रतिसाद पथक, नियंत्रण कक्षाची स्थापना उपसंचालक, जिल्हा, तालुका, प्रा. आ. केंद्र स्तरावर शीघ्र प्रतिसाद पथक कार्यान्वित करण्यात यावे, तालुका, जिल्हा, तसेच उपसंचालक स्तरावर नियंत्रण कक्षाची स्थापना करणे आवश्यक. विविध प्रसारमाध्यमाद्वारे साथरोगविषयक आजारांसंदर्भात जनतेचे प्रबोधन करण्यात यावे, अशा सूचना आरोग्य विभागामार्फत करण्यात आल्या आहेत. आहेत. मान्सूनपूर्व तयारीच्या प्रशासकीय यंत्रणेच्या सज्जतेचा आढावा घेण्याच्या सूचना सर्व जिल्ह्यांना दिल्या आहेत. साथरोग प्रतिबंध व नियंत्रणाचे काम अधिक नेमकेपणाने तसेच मनुष्यबळ व साधनसामुग्रीच्या सुयोग्य नियोजनाने साध्य करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्याने आपल्या भागातील जोखीमग्रस्त गावांची यादी तयार करावी. त्याचप्रमाणे, प्रत्येक आरोग्य कर्मचाऱ्याचे पंधरवडा सर्वेक्षण कॅलेंडर तयार करण्यात यावे. प्रत्येक जिल्ह्यात काही आश्रमशाळा, विद्यार्थी वसतिगृह, वृद्धाश्रम अशा संस्था कार्यरत आहेत. या संस्थांना क्षेत्रीय भेटीमध्ये वैद्यकीय अधिकारी आणि आरोग्य कर्मचाऱ्यांनी नियमित भेटी देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

# तुळजाभवानी मंदिरातून प्राचीन अलंकारांची चोरी, छडा लावण्यासाठी पुरातत्व विभाग, गोल्ड एक्स्पर्टसची मदत

**उस्मानाबाद । प्रतिनिधी**

आई तुळजाभवानीचे प्राचीन आणि मौल्यवान अलंकार गायब प्रकरणानंतर श्री तुळजाभवानी मातेच्या मौल्यवान अलंकारांची पुरातत्व विभाग तज्ज्ञांकडून इनकॅमेरा तपासणी करण्यात येणार आहे. देवीच्या प्राचीन व मौल्यवान अलंकारांच्या वजनात तफावत आढळून आल्याचे यापूर्वीच मंदीर सम ितीच्या विविध समीत्यांच्या मोजणीत उघड झाले होते. या पार्श्वभूमीवर इन कॅमेरा तपासणी करण्यात येणार आहे.

तुळजाभवानी मातेच्या प्राचीन आणि मौल्यवान प्रकरणी महतासह, सेवेकरी पलगे व तत्कालीन धार्मिक व्यवस्थापकावर १९ डिसेंबर २०२३ रोजी



गुन्हा दाखल करण्यात आला होता. उपविभागीय पोलीस अधिकारी निलेश देशमुख पुरातत्व विभाग व सोने तज्ज्ञांच्या मदतीने १ ते ७ डब्यातील अलंकारांची तपासणी करणार आहेत. विविध रजिस्टर, फोटो अल्बम नुसार पाहणी करून नव्याने नोंदी घेतल्या जाणार आहेत. यासाठी पथक तुळजापूरात झाले दाखल होते.

तुळजाभवानी मातेचे प्राचीन व मौल्यवान अलंकार गायब प्रकरणी आमदार महादेव जानकर यांनी सोमवारी विधान परिषदेत प्रश्न उपस्थित केला होता. श्री तुळजाभवानी देवीचा सोन्याचा मुकुट व इतर दागिने गहाळ झाले होते.. अनेकांची कुलदेवी असल्याने भाविक देवीला नवस बोलतात. नवस पूर्ण झाल्यावर अनेक भक्त श्रद्धेने कबुल केल्याप्रमाणे सोन्याचे दागीने आणि वस्तू देवीच्या चरणी अर्पण करतात. हे दागीणे मंदिर संस्थान नोंदणी करून सुरक्षीत ठेवते. या शिवाय देवीच्या अलंकारांचीसुद्ध जबाबदारी मंदिर प्रशासनाकडे आहे, मात्र नुकत्याच समोर आलेल्या माहिती नुसार देवीच्या २७ अलंकारा पैकी ४ अलंकार गायब झाले तर १२ पदराच्या ११ पुतळ्या असलेले मंगळसूत्रावर देखील डल्ला मारण्यात आला.

# राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाच्या आष्टी तालुका उपाध्यक्षपदी युवा पत्रकार दादासाहेब पवळ यांची निवड

**आष्टी । प्रतिनिधी**

राज्यासह राष्ट्रीय पातळीवर पत्रकारांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे व त्यांच्या न्याय हक्कासाठी लढत असलेल्या राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाच्या आष्टी तालुकाध्यक्ष पदाची नुकतीच आण्णासाहेब साबळे यांची निवड जाहीर केल्यानंतर आज ३१ मे रोजी आष्टी तालुका उपाध्यक्ष पदाची घोषणा संघाचे जिल्हाध्यक्ष डी.एम.मुजमुले यांनी जाहीर केली आहे.



राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष विजयजी सूर्यवंशी,राष्ट्रीय कार्याध्यक्ष बाळासाहेब अढांगळे,राष्ट्रीय सचिव प्रवीण परमार यांच्या मार्गदर्शनाखाली व राज्य अध्यक्ष संतोष जाधव,राज्यसचिव निलेश ठाकरे,मराठवाडा अध्यक्ष शंकरसिंह ठाकूर,उपाध्यक्ष मुबशिर खतिब,यांच्या मार्गदर्शनाखाली व आष्टी तालुका अध्यक्ष आण्णासाहेब साबळे यांच्या विचारानुसार आष्टी तालुका उपाध्यक्ष पदी दैनिक लोकप्रभा प्रतिनिधी दादासाहेब त्रिंबकराव पवळ यांची निवड जिल्हाध्यक्ष डी.एम.मुजमुले यांनी जाहीर केली.दादासाहेब पवळ यांच्या निवडीचे मित्रपरिवार ,पत्रकारसह विविध क्षेत्रातून अप्रत्यक्ष प्रत्यक्ष मिडियामाधातून अभिनंदनाचा वर्षाव होताना दिसत आहे.

# जागतिक तंबाखूविरोधी दिन; कायद्याची कठोर अंमल बजावणी गरजेची;तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन घातकच

**मुंबई । प्रतिनिधी**

सिगारेट, मद्य, तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन हे जणू आता शरीराच्या सवयीचा भाग झाला आहे. कोणी तणावमुक्त जगण्यासाठी तर कोणाच्या जीवनात वाईट प्रसंग घडल्यावर तर कोणी पहिल्यांदा अनुभव घेण्यासाठी पहिल्यांदा तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन करतो आणि त्याची चटक लागली की तो आहारी जातो. तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन करण्यात महिलांचाही संख्या मोठी आहे. तंबाखू आरोग्यास हानिकारक यासाठी २००५ मध्ये तंबाखू पदार्थजन्य विक्री करण्यावर बंदीचा कायदा अंमलात आणला. मात्र १९ वर्षे या कायद्याची अंमलबजावणी कागदावरच राहिली आहे. व्यसनाचे विविध प्रकार असले तरी व्यसनाचा

मुख्य किलर तंबाखू आहे. आजची तरुण पिढी देशाचे उद्याचे भविष्य आहे. त्यामुळे केंद्र, राज्य सरकार व त्या-त्या स्थानिक संस्थानी आपले क्षेत्र तंबाखूमुक्त करण्यासाठी कायद्याची कठोर अंमलबजावणी करणे, मोठ्या प्रमाणावर जनजागृती मोहीम राबवणे गरजेचे आहे, असे नशाबंदी मंडळाच्या सरचिटणीस वर्षा विद्या विलास यांनी जागतिक तंबाखूविरोधी दिनानिमित्त दैनिक 'नवशक्ति'शी बोलताना सांगितले.

मुंबईतील टाटा मेमोरियल रुग्णालयासह देशातील विविध रुग्णालयांनी केलेल्या अभ्यासातून तंबाखूचे सेवन करणाऱ्यांची संख्या झपाट्याने वाढत आहे.

कर्करोगाच्या

रुग्णांमध्ये वाढ झाली आहे. याचा महाराष्ट्राच्या आरोग्य व्यवस्थेवर मोठा भार पडला आहे. अशा स्थितीत शैक्षणिक संस्थांजवळ तंबाखूजन्य पदार्थांच्या विक्रीवर कडक बंदी घालण्याची गरज असल्याचे मत आरोग्य तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे. महाराष्ट्रातील २७ टक्के लोकसंख्येला तंबाखू सेवनाच्या दुष्परिणामांचा फटका बसत असल्याचे अभ्यासात नमूद करण्यात आले आहे. तंबाखूजन्य कर्करोगाच्या लक्षणांबद्दल जागरूकता नसणे आणि लहान वयात तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन करणे, ही प्रमुख कारणे असल्याचे वैद्यकीय तज्ज्ञांचे मत आहे.

टाटा रुग्णालयात कर्करोगाच्या ४४०० रुग्णांची नोंद

५०० मीटर परिसरात बंदी करणे गरजेचे !

शाळा, महाविद्यालय, रुणालय, मंदिरापासून १०० मीटर अंतराच्या आत तंबाखूजन्य पदार्थ विक्री करण्यास बंदी आहे. तरीही १०० मीटर अंतराच्या आत तंबाखूजन्य पदार्वांची विक्री होत असल्याचे चित्र आजही पाहावयास मिळते. मुंबई महापालिकेने शाळा परिसरात तंबाखूजन्य पदार्थ विक्री बंदी असे मोठे फलक लावत जनजागृती करणे गरजेचे आहे. टाटा मेमोरियल रुग्णालयात थोरॅसिक डिसीज मॅनेजमेंट ग्रुप २०२३ मध्ये अन्ननलिका कर्करोगाने ग्रस्त २,६०० रुग्ण आणि १,८०० रुग्णांची नोंदणी केली. यापैकी फक्त १४० जणांवर फुफ्फुसाचा कर्करोग आणि १८० अन्ननलिकेचा कर्करोग असलेल्या रुग्णांवर शस्त्रक्रिया करता आली.

हानिकारक तंबाखूचे धडे शिक्षकांनाही द्या !

तंबाखूचे सेवन आरोग्यास हानिकारक आहे, याची कल्पना सगळ्यांना आहे. तरीही काही ना काही कारणांमुळे लोक व्यसनाच्या आहारी जात आहेत. तंबाखू आरोग्यास घातक याबाबत पाठ्यपुस्तक उल्लेख आहे. मात्र बीए, डीएडच्या शिक्षकांना तंबाखूजन्य पदार्थ किती घातक याची माहिती उपलब्ध करून दिल्यास ते विद्यार्थ्यांना आणखी चांगल्या पद्धतीने समजवू शकतील, असे मत वर्षा विद्या विलास यांनी व्यक्त केले.



# जिल्हाधिकाऱ्यांकडून स्ट्राँग रुमसह मतमोजणी व्यवस्थेची पाहणी

## एकूण मतमोजणी टेबल १०१;उपलब्ध कर्मचा–यांची संख्या ३७९;प्रशासनाकडून युध्दपातळीवर तयारी



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

निवडणूक प्रक्रियेमधील अतिशय महत्वाचा समजला जाणारा मतमोजणीचा टप्पा,येत्या मंगळवारी (४ जून) होणार आहे. यासाठी जिल्हा प्रशासनाची युध्द पातळीवर तयारी सुरू आहे. मतमोजणी करीता प्रशासन पूर्णपणे सज्ज असून या व्यवस्थेची पाहणी करण्याकरीता निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी वखार महामंडळाच्या गोडाऊन येथील स्ट्राँग रुमसह मतमोजणी केंद्राची पाहणी केली व सूचना दिल्या.

१३– चंद्रपूर लोकसभा मतदारसंघाची निवडणूक पहिल्या टप्प्यात १९ एप्रिल २०२४ रोजी पार पडली. जवळपास दीड महिन्यांच्या कालावधीनंतर येत्या ४ जून रोजी पडोली एमआयडीसी परिसरातील वखार महामंडळाच्या गोडावून येथे मतमोजणी होणार आहे. या व्यवस्थेचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी मतमोजणी केंद्राला भेट दिली. प्रत्यक्ष मतमोजणीकरीता येथे असलेल्या एकूण टेबलची व्यवस्था,उमेदवार, निवडणूक प्रतिनिधी व मतमोजणी प्रतिनिधींच्या बसण्याची व्यवस्था,लावण्यात आलेले बॅरेकेटींग, सीसीटीव्ही,विद्युत व्यवस्था,ईव्हीएम असलेल्या स्ट्राँगरूमचा मार्ग,सुरक्षा व्यवस्था,मिडीया सेंटर आदींचा त्यांनी आढावा घेतला. तसेच संबंधितांना सुचनाही केल्या. यावेळी अतिरिक्त जिल्हाधिकारी श्रीकांत देशपांडे,उपजिल्हाधिकारी दगडू कुंभार,उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुभाष चौधरी,उपविभागीय अधिकारी विशालकुमार मेश्राम,अजय चरडे,जिल्हा सुचना विज्ञान अधिकारी सतीश खडसे यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

**मतमोजणीकरीता एकूण टेबल व फेऱ्यांची संख्या**

चंद्रपूर लोकसभा मतदारसंघात येत असलेल्या सहा विधानसभा मतदारसंघासाठी (ईव्हीएम मतमोजणी) प्रत्येकी १४ टेबल याप्रमाणे एकूण ८४ टेबल,टपाली मतपत्रिका मोजण्याकरीता ९ टेबल आणि ईटीपीबीएमएस (सर्व्हिस व्होटर मतपत्रिका) मोजण्याकरीता ८ टेबल असे एकूण १०१ टेबल राहणार आहेत. तसेच राजुरा विधानसभा मतदारसंघाच्या २४ फेऱ्याचंद्रपूर – २८,बल्लारपूर–२६,वरोरा–२५,वणी–२५,आणि आर्णि मतदारसंघाच्या मतमोजणीच्या २७ फेऱ्या होणार आहेत.

**नियुक्त कर्मचाऱ्यांची संख्या**

प्रत्यक्ष मतमोजणी करीता आणि अतिरिक्त स्टाफ धरून १२० टक्के याप्रमाणे एकूण ३७९ कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. यात मतमोजणी पर्यवेक्षकांची संख्या १२२,मतमोजणी सहायक १४० आणि सुक्ष्म निरीक्षकांची संख्या ११७ आहे.

**मतमोजणी केंद्रावर नियुक्त सुरक्षा व्यवस्था**

मतमोजणी आवाराच्या / परिसराच्या सभोवताली १०० मीटर परिघापासून राज्य पोलिस,मतमोजणी आवाराच्या प्रवेशद्वारावर राज्य सशस्त्र पोलिस आणि मतमोजणी कक्षाच्या द्वाराजवळ केंद्रीय सशस्त्र पोलिस दल तैनात आहे.

**मोबाईल व इलेक्ट्रॉनिक वस्तुंना प्रतिबंध**

मतमोजणी केंद्रात मोबाईल,कॅमेरा,लॅपटॉप,आयपॅड,तसेच कोणतीही इलेक्ट्रॉनिक वस्तु नेण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींनासुध्दा केवळ मिडीया सेंटरमध्येच मोबाईलचा वापर करता येईल. प्रत्यक्ष मतमोजणी केंद्रात जातांना मोबाईल,कॅमेरा मिडीया सेंटर येथे जमा करावा लागेल.

**उमेदवार / प्रतिनिधींना अत्यावश्यक सुचना**

मतमोजणी परिसरात तीन स्तरीय सुरक्षा व्यवस्था असल्याने प्रत्यक्ष मतमोजणी स्थळी एकदाच प्रवेश दिला जाईल,परिसर सोडल्यास पुन्हा प्रवेश नाकारण्यात येईल. उमेदवार / उमेदवारांचे प्रतिनिधींनी आपले मोबाईल / इलेक्ट्रॉनिक संयत्रे जमा करणे बंधनकारक राहील.

# राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी



**पुलगाव । प्रतिनिधी**

दिनांक ३१ मे रोज शुक्रवारला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची २९९ वी जयंती पुण्यश्लोक अहिल्यादेवी सांस्कृतिक भवन अयोध्या नगर पुलगाव नाचणगाव येथे साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून महाराष्ट्र राज्याचे भाजपा ओबीसी मोर्चा अध्यक्ष संजय गाते उपस्थित होते तर प्रमुख अतिथी म्हणून पुलगाव येथील ड. दिनेश शर्मा , राहुल सोनवणे (पुलगाव ठाणेदार), दिलीप अग्रवाल माजी जिल्हा परिषद सदस्य, धनगर समाजाचे उपाध्यक्ष रामदास साव. ज्ञानेश्वर गोरडे. दिलीपराव भुजाडे मान्यवर उपस्थित होते. उपस्थित पाहुण्यांनी दीप प्रज्वलन करून मातेला हार अर्पण करून पूजन केले.त्यानंतर कार्यक्रमाचे प्रास्ताविक विजय ढगे सचिव यांनी केले. दिनेश शर्मा यांनी सुसंस्कार नवीन पिढीवर कसे रुजवावे हे सांगितले. पुण्यश्लोक यांच्या जीवनावर सखोल माहिती सांगितली. यानंतर संजय गाते यांनी अहिल्याबाई होळकर यांच्या जीवनचरित्रावर अमूल्य अशी माहिती दिली. कार्यक्रमाचे संचालन वाडकर यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ.रायपुरे यांनी केले. कार्यक्रमात सर्व धनगर समाज बांधव महिला मंडळी उपस्थित होते.

# मुल येथे भाजपाच्या वतीने अहिल्यादेवी होळकर जयंती

**मूल । प्रतिनिधी**

पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची जयंती भाजपा मूल च्या वतीने दिनांक ३१ मे ला संध्याकाळी सहा वाजता भाजपा कार्यालय मुल येथे उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी नगरपरिषद मूलचे माजी पाणीपुरवठा सभापती मिलिंद खोब्रागडे हे होते. कार्यक्रमाची सुरुवात राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन व मालार्पण करून करण्यात आली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाजपा ओबीसी आघाडी मूल शहर अध्यक्ष युवराज चावरे यांनी केले. उपस्थितांनी राजमाता अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य हे लोककल्याणकारी होते. त्यांनी मंदिरे व तीर्थस्थानांचे जीर्णोद्धार करून संरक्षण दिले. भारतीय शिल्प, कला, साहित्य, संस्कृती यांची त्यांनी अमोल सेवा केली. त्यांनी सर्व भारतीयांना एकत्रित




करून इंग्रजांविरुद्ध लढा पुकारला व भारतीयांच्या मनात स्वातंत्र्याची ज्योत पेटवली. त्यांनी त्या काळातही स्त्रियांचा योग्य सन्मान केला व प्रजापालनाचे उत्कृष्ट कार्य केले. अशा या प्रजा वत्सल रणरागिणीचे विचार सर्वांनी आत्मसात करावे असे आवाहन केले. यावेळी नगरपरिषद मूलचे माजी बांधकाम सभापती प्रशांत समर्थ, नगर परिषदेचे माजी उपाध्यक्ष प्रवीण मोहुर्ले, ग्रामगीताचार्य सुखदेव चौथाले आदींनी अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनावर प्रकाश टाकून उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला नगरपरिषद मूल चे माजी उपाध्यक्ष नंदकिशोर रणदिवे, माजी नगरसेवक अजय गोगुलवार, नगरपरिषद मूल चे माजी पाणीपुरवठा सभापती अनिल साखरकर, सामाजिक कार्यकर्ते प्रशांत बोबाटे, धनगर समाज मूल चे अध्यक्ष दिलीप यारेवार, प्रज्वल भोयर,गणेश मेश्राम आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन नगरपरिषद मूल चे माजी सभापती अनिल साखरकर यांनी केले.

# सराफ व सुवर्णकार यांनी एकजुट करून भयमुक्त व्हावे–जिल्हाध्यक्ष संतोष वर्मा

**कर्जत । प्रतिनिधी**

भारतात सगळ्यात मोठा भ्रष्टाचार पोलिस खात्यात असून राजरोसपणे लुटले जात आहे, जगामध्ये सोनार असा व्यवसाय आहे ज्याला चोर व पोलिस असा दोघांचा ही त्रास आहे असे म्हणत सोन्याचा व्यवसाय हाच सर्वात प्रामाणिक व्यवसाय असून आम्ही विकलेल्या वस्तूचे पुन्हा ८० टक्के पैसे परत देतो पण आम्ही संघटित नसल्यामुळे त्रास होत असून खाकी वर्दीची गुंडगिरी संपवण्यासाठी मी काम करतो आहे असे प्रतिपादन भारतीय सराफ सुवर्णकार संघटनेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष तथा अहमदनगर जिल्हाध्यक्ष संतोष वर्मा यांनी व्यक्त केले. मिरजगाव सराफ सुवर्णकार संघटनेचे वतीने जिल्हास्तरिय सराफ सुवर्णकार व्यावसाईकांच्या मेळाव्याचे आयोजन पुष्पराज मंगल कार्यालय या ठीकाणी करण्यात आले यावेळी कुमारपाल नहार यांनी




प्रास्ताविक करताना सराफी व्यवसायात नवीन पिढी यायला तयार नाही असे म्हणत व्यावसायीकांच्या अडचणी मांडल्या. गेली सहा महिन्यात मिरजगाव मधील व्यावसायीकांना राज्यातील पोलिसांचा खूप त्रास झाला आहे, यामध्ये संघटनेबरोबर राहिलेल्या लोकांना त्रास कमी झाला मात्र ज्यांनी मधला मार्ग काढला त्याचे नुकसान झाले आहे त्याला संघटना काही करू शकत नाही असे विचार मांडत संघटनेची सर्वांना मदत होईल अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी जी.प. सदस्य गुलाब तनपुरे यांनी बोलताना २४ क्यारेट सोने विकणारे व २४ क्यारेट व्यक्ती असलेले व्यावसायिकच धास्तावलेले आहेत अशी खंत व्यक्त करताना त्यांना खर्या अर्थाने मदतीची गरज आहे अशी अपेक्षा व्यक्त केली.

अहमदनगर जिल्हाउपाध्यक्ष दिपक शहाणे यांनी बोलताना गेली काही दिवसापूर्वी मिरजगाव मध्ये पोलिसांनी कशी दहशत निर्माण केली हे सांगत या प्रकरणात आ. रोहित पवार यांनी मदत करून सातारा येथील पोलिस अधीक्षक शेख यांच्या बरोबर बोलून मदत केल्याचे सांगताना आगामी काळात सर्वांनी एकत्र राहण्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले. या प्रसंगी राज्य उपाध्यक्ष बाळासाहेब शहाणे यांनी बोलताना आपल्याला कायद्याचे ज्ञान नाही म्हणून सराफ व्यावसायीक भयग्रस्त झाला आहे. त्यामुळे संघटनेची गरज आहे. मात्र अनेक व्यावसायीक दूर राहत आहेत, आपण एकजूट राहिलो तर कायदा सुद्धा बदलण्याची आपल्यात ताकद आहे. अनेक बँकांचे गोल्ड व्हॅल्यूअर जुन्या सोन्याबाबत शंका घेतात त्यांनी समाजाचे व व्यावसायिक बांधवांचे पाय ओढण्याचे काम करू नये असे मत व्यक्त केले. यावेळी संपत बावडकर, नितीन खेतमाळीस, अमृत लिंगडे, परमवीर पांडूळे, आदींनी मनोगते व्यक्त केले.

भारतीय सराफ सुवर्णकार संघटनेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष तथा अहमदनगर जिल्हाध्यक्ष संतोष वर्मा यांनी जुन्या आठवणी सांगताना आता काळ बदलला आहे मात्र सुवर्णकार सराफ यांच्या वर असलेली चोरांची व पोलिसांची दहशत मात्र कमी झालेली नाही असे सांगत कायद्याची सविस्तर माहिती दिली. कलम ४११ समजून घेऊन प्रत्येकाने अभ्यास केला पाहिजे व इतरांनी एकमेकाला साथ दिली पाहिजे. मी आतापर्यंत साडे तीन हजार सोनाराची एक मिली रिकव्हरी होऊ न देता व एक रुपया खर्च होऊ न देता सराफ बांधवांना पोलिसांच्या कचाट्यातून सोडवले आहे असे सांगताना आजकाल आपण शंभर ग्रॅम सोन्यात मोठे शोरुम टाकतो व पोलिसांना वाटते यांचे कडे लई पिवळे दिसते आहे. त्यामुळे ते दमदाटी करतात दहशत निर्माण करतात मात्र अशा वेळी आपण सर्वांनी खंबिरपणे साथ दिली पाहिजे, संघटनेत राहणाऱ्या इतरांच्या मदतीला धावून जाणाऱ्या वर कोणताही प्रसंग आल्यास त्याच्या केसाला ही धक्का लागू देणार नाही मात्र तुम्ही खरे बोलले पाहिजे असे आवाहन शेवटी वर्मा यांनी केले. संतोष वर्मा की यही पुकार भयमुक्त हो सराफ सुवर्णकार अशी जोरदार घोषणा सर्वांनी शेवटी दिली.

या प्रसंगी अहमदनगर जिल्ह्यातील संजय देवळालीकर, प्रशांत मुंडलीक, बाळासाहेब जिरेसाळ, विजय डहाळे, दिपक देडगावकर, संजय उदावंत, रवींद्र डहाळे, अमित चिंतामणी, प्रदीप वेदपाठक, राजेंद्र बागडे, पोलीस पाटील संदीप महामुनी, माणिकराव बुराडे, धनराज नहार, आदी सह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते. मिरजगाव सराफ सुवर्णकार संघटनेचे अध्यक्ष बापुशेठ कासवा यांच्या मार्गदर्शनाखाली प्रसाद पंडित, राजेंद्र महामुनी, किशोर महामुनी, सुरेश मैड, अतुल पंडित, राहुल पंडित, अभिजित धोगडे, पांडुरंग बुराडे, यशवंत आजबे, संजय महामुनी, शुभम महामुनी, श्रीपाल कासवा, निलेशशेठ भंडारी, किरणशेठ शिगंवी, तनमय भंडारी, संतोष महामुनी, दिप महामुनी, यांचे सह कर्जतचे सारंग शहाणे, अंनिस सय्यद, अतुल कुलथे, अक्षय माळवे, सागर कुलथे, हेराल सय्यद, सागर शहाणे, नाना शहाणे, शुभम कुलथे, धनंजय महामुनी, अमोल टाक, अमोल कुलथे, बाळासाहेब कुलथे, उमेश कुलथे, वाजीद शेख, अनुज कुलथे, शरद डमरे, सुशांत कुलथे, नविद सय्यद व सर्व कारागीर आदी सह अनेकांनी विशेष परिश्रम घेतले. शेवटीं उपाध्यक्ष जाकीर सय्यद यांनी आभार मानले.गेली काही दिवसात मिरजगाव येथील सराफ व्यापाऱ्यांना विविध ठिकाणच्या पोलिसांनी त्रास दिला या प्रसंगात कर्जत मधील दिपक शहाणे यांनी जिल्हाध्यक्ष संतोष वर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली दोन्ही सराफाना सही सलामत बाहेर काढले याबद्दल सर्वांनीच जिल्हाउपाध्यक्ष दिपक शहाणे यांचे कौतुक केले तर वर्मा यांनी ही असेच लढाऊ व अभ्यासू व्यक्तिमत्त्व जागोजाग निर्माण झाले पाहिजेत अशी अपेक्षा व्यक्त केली.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.

Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .